असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी ९, २००६ / पौष १९, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**—महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम .. पृष्ठे १-३

दिनांक ७ जानेवारी २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ जानेवारी २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

### महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम.

२००५ चा २२. २००३ चा महा. ३१.

**ज्याअर्थी,** संसदेकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमित करण्यात आला आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करणे आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटले ;

**आणि ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी**, उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि म्हणून त्यांनी दिनांक ५ ऑक्टोबर २००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, २००५ प्रख्यापित केला होता ; २००३ चा महा. ३१. २००५ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२.** (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००३ चा महा. ३१.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास,—

(क) शासकीय माहिती अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज ; आणि

(ख) अपिलीय प्राधिकारी किंवा, यथास्थिति, लोक आयुक्त वा उप लोक आयुक्त यांच्याकडे प्रलंबित असलेली सर्व अपिले,—

जणू काही हा अधिनियम केला नव्हता असे मानून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याच्या तरतुदींनुसार पुढे चालू ठेवण्यात येतील व ती निकालात काढण्यात येतील. २००३ चा महा. ३१.

२००५ चा महा. अध्या. ७.

**३.** (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, २००५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा, यथास्थिती, केलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जानेवारी ९, २००६/पौष १९, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Right to Information (Repeal) Act, 2005 (Mah. Act No. I of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**A. M. SHINDEKAR,**
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. I OF 2006.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 9th January 2006).*

An Act to provide for repeal of the Maharashtra Right to Information Act, 2002 and for certain matters incidental thereto.

22 of 2005. Mah. XXXI of 2003. WHEREAS the Right to Information Act, 2005 has been enacted by the Parliament and, therefore, it was considered expedient to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002, and to provide for certain matters incidental thereto ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002, for the purposes aforesaid; and, therefore, promulgated the Maharashtra Right to Information (Repeal) Ordinance, 2005, on the 5th October 2005 ; Mah. XXXI of 2003. Mah. Ord. VII of 2005.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :--

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Right to Information (Repeal) Act, 2005.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 11th October 2005.

Repeal of Mah. XXXI of 2003 and saving.

**2.** (*1*) The Maharashtra Right to Information Act, 2002, is hereby repealed. Mah. XXXI of 2003.

(*2*) Notwithstanding such repeal,---

(*a*) all applications pending with the Public Information Officers ; and

(*b*) all appeals pending with the appellate authorities or the Lokayukta or Upa-Lokayuktas, as the case may be,

on the date of commencement of this Act shall be continued and disposed of in accordance with the provisions of the Maharashtra Right to Information Act, 2002, as if this Act had not been enacted. Mah. XXXI of 2003.

Repeal of Mah. Ord. VII of 2005 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Right to Information (Repeal) Ordinance, 2005, is hereby repealed. Mah. Ord. VII of 2005.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the said Ordinance, shall be deemed to have been done or taken, as the case may be under this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई